दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक ३३४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • सोमवार दि.२८ फेब्रुवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## अमित ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या अध्यक्षपदी निवड

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आगामी मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या होणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसेने मोठा निर्णय घेतला आहे. गेल्या काही वर्षांपासून मनसेमध्ये सक्रीय असलेले राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे यांच्याकडे आजच्या मराठी भाषा गौरव दिनाचा मुहुर्त साधून मनसेने मोठी जबाबदारी सोपवली आहे. मनसेने अमित ठाकरे यांची निवड महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या अध्यक्षपदी केली आहे.



आज सकाळी मनसेच्या मुंबईतील राजगड या मध्यवर्ती कार्यालयाने एक पत्रक प्रसिद्ध करून या संदर्भातील घोषणा केली आहे. आज मराठी भाषा गौरव दिवशी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या अध्यक्षपदी अमित राज ठाकरे यांची नियुक्ती जाहीर करण्यात येत आहे, असे या पत्रकात म्हटले आहे.

# डॉ.सी.डी.देशमुख यांच्या नावाला साजेशी वास्तू साकारा : उपमुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मुळ रोह्याचे असलेले डॉ. चिंतामणराव देशमुख उर्फ सी. डी. देशमुख हे एक कर्तुत्ववान व्यक्तिमत्व होते. अशा या महान व्यक्तिमत्वाच्या नावाला साजेशी वास्तू उभी करावी, त्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांनी आज येथे केले.रोहा येथे डॉ. चिंतामणराव देशमुख शहर सभागृहाचा भूमीपूजन सोहळा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी पालकमंत्री कु. आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, माजी आमदार सुरेश लाड, जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे, सभापती गीताताई जाधव, बबन मनवे, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, प्रांताधिकारी डॉ.यशवंत माने, तहसिलदार कविता जाधव, पदाधिकारी, नगरसेवक, नागरिक उपस्थित होते.



आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच स्व.कुसुमाग्रज व डॉ.चिंतामणराव देशमुख यांच्या स्मृतीला अभिवादन करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील तमाम जनतेला व कार्यक्रमाच्या निमित्ताने जमलेल्या नागरिकांना मराठी भाषा दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

ते पुढे म्हणाले,करोना काळात राज्यावर आर्थिक संकट ओढवले होते. मात्र या शासनाने राज्यातील विकासकामांना खीळ बसणार नाही, विकासकामांची गती मंदावणार नाही, याकरिता सर्व प्रकारे काळजी घेतली. रायगडमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी ४०६ कोटींचा नियतव्यय मंजूर केला, महिलांसाठी शंभर खाटांचे विशेष रुग्णालय , ९३ पर्यटन स्थळांना जोडणारा रेवस–रेड्डी मार्ग, ७२० किलोमीटर समुद्रकिनारा पर्यटनदृष्ट्या विकसित करण्यासाठीचे नियोजन, आंतरराष्ट्रीय विमानतळ, जलवाहतूक वाढीस लागण्यासाठी त्या दृष्टीने नियोजन, जिल्ह्यात तेरा आयकॉनिक पूलांचे भव्यदिव्य नाविन्यपूर्ण काम त्याचबरोबर तालुका क्रीडा संकुलासाठी ५ कोटी, जिल्हा क्रीडा संकुलासाठी २५ कोटी तर माणगाव येथील विभागीय क्रीडा संकुलासाठी ५० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. ही सर्व कामे दर्जेदार होण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न व्हावेत, या कुठल्याही कामासाठी निधीची कमतरता पडू दिला जाणार नाही.

उपमुख्यमंत्री पवार पुढे म्हणाले की, डॉ.सी.डी. देशमुख हे स्वतंत्र भारताच्या अर्थशास्त्रातील मोठे नाव होते. स्वतंत्र भारताचे पहिले अर्थमंत्री, रिझर्व बँकेचे पहिले गव्हर्नर, विद्यापीठ अनुदान समितीचे पहिले अध्यक्ष अशा विविध मोठ्या जबाबदाऱ्या पार पाडताना ते आपल्या मूळ गावाला मात्र कधीही विसरले नाहीत. त्यांच्या नावाने साकारले जाणारे हे शहर सभागृह व नाट्यगृह सर्वोत्तम होईल, याकडे कटाक्षाने लक्ष दिले जावे. २२ कोटी ७० लाख इतक्या निधीतून साकारल्या जाणाऱ्या या सभागृहात ८०० खुर्च्या, सोलर पॅनल, संपूर्ण वातानुकूलित यंत्रणा, सुसज्ज वाचनालय, कॅफेटेरिया, ग्रीन रूम, प्रोजेक्ट रूम, अत्याधुनिक ध्वनीक्षेपण यंत्रणा अशा विविध सोयी–सुविधा दिल्या जाणार आहेत. यासाठी अधिक निधीची गरज लागली तरी तो पुरविला जाईल. कुंडलिका नदी संवर्धन प्रकल्प उत्तम झाल्याबाबत समाधान व्यक्त करुन उपमुख्यमंत्री श्री.पवार पुढे म्हणाले की, जनतेचे प्रश्न त्यांच्या गरजा लक्षात घेऊन लोकप्रतिनिधी व प्रशासकीय यंत्रणेने विविध नाविन्यपूर्ण योजना राबवून नव्या पिढीला जुना वारसा जतन करण्याचे संस्कार द्यावेत. हे काम रोहा येथे कुंडलिका नदी संवर्धन, शिवसृष्टी, छत्रपती शिवाजी महाराजांचा साकारण्यात येणारा ३५ फूट पुतळा, स्वराज्यातील महत्त्वाच्या सहा किल्ल्यांची प्रतिकृती उभारण्याच्या कामातून केले जात आहे, याबद्दल संबंधित सर्वांचे श्री.पवार यांनी अभिनंदन केले. तसेच या भागात जागतिक दर्जाची बाग साकारण्यात यावी, असे आवाहन करताना त्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे त्यांनी पुनःश्च सांगितले. शेवटी युक्रेन रशिया युद्धाच्या पार्श्वभूमीवर तेथे अडकलेल्या नागरिकांच्या, विद्यार्थ्यांच्या नातेवाईकांनी काळजी करू नये. केंद्र व राज्य शासन त्या सर्वांना सुखरूपपणे आपापल्या घरी परत आणण्यात नक्कीच यशस्वी होईल, असा विश्वासही व्यक्त केला.

## उपजिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही डेब्रिज माफियांचे बेकायदेशीरपणे कचरा-डेब्रिज टाकण्याचे काम सुरुच

### अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली : जासई, गव्हाण, वहाळच्या नागरिकांमध्ये संताप

**दै.रायगड नगरी । उरण**

उपजिल्हाधिकारी राहुल मुंडके यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवित प्रदुषण नियंत्रण मंडळ, आणि प्रशासनाच्याच काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या वरदहस्तामुळे मुंबईतील जासई–गव्हाण–वहाळ ग्रामपंचायतींच्या हद्दीत बेकायदेशीरपणे नागरिकांच्या आरोग्यास हानिकारक आणि प्रदुषणास कारणीभूत ठरत असलेला हजारो टन कचरा– डेब्रिज टाकण्याचे काम सुरुच आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुंबईतून दररोज हजारो टन कचरा –डेब्रिज जासई–गव्हाण – वहाळ ग्रामपंचायतींच्या हद्दीत बेकायदेशीरपणे टाकण्यात येत असल्याने कचरा डेब्रिजचे ५० फुट उंचीचे डोंगर निर्माण झाले आहेत. या डेब्रिजमध्ये गटारातील घाण, मृत पशुपक्षी, प्राण्यांच्या अवयवांमुळे हवेतही मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असल्याने वायु प्रदुषणात भर पडली आहे.परिसरात वाढते वायु प्रदुषण व दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

मुंबईतील दररोज येणारा हजारो टन कचरा डेब्रिज उलवे नोड परिसरात आणखी बऱ्याच ठिकाणी हा धोकादायक कचरा–डेब्रिज कचरा टाकण्यात येत आहे. यामुळे खाड्याही बुजविण्यात आल्या आहेत.बामणडोंगरी खाडी, वहाळ हद्दीत तर चक्क खारफुटींवर हा कचरा टाकून कांदळवन नष्ट करण्यात येत आहेत.तर काही ठिकाणी डेब्रिज कचरा धुतला जातो आहे. डेब्रिज कचरा धुतलेले दूषित घाण पाणी थेट समुद्र, खाड्यात सोडले जात आहे.

या दुषीत पाण्यामुळे समुद्र, खाड्याही प्रदुषित झाल्याने येथील स्थानिक मच्छीमारांना मासळी मिळेनाशी झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. याबाबत संबंधित ग्रामपंचायतींच्या अनेक तक्रारी सिडको,तहसिल, पोलिसांकडे करण्यात आल्या आहेत.ग्रामपंचायतींच्या तक्रारींकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. या गंभीर प्रश्नाबाबत विविध वृत्तपत्रांतून वाचा फोडण्यात आल्यानंतर उपजिल्हाधिकारी राहुल मुंडके यांनी प्रदुषण नियंत्रण मंडळ, नवीमुंबई पोलिस आयुक्त आणि संबंधित विभागाला तत्काळ वाहतूक करणाऱ्या वाहनांवर जप्तीची कारवाई करण्याचे आदेश दिले होते. उपजिल्हाकाऱ्यांच्या आदेशानंतर काही दिवस कचरा–डेब्रीज टाकण्याचे काम बंद झाले होते.

मात्र दोन दिवसांपासून तुरळक प्रमाणात तर शासकीय सुट्यांचा फायदा घेत डेब्रिज माफियांनी शनिवार, रविवारी मोठ्या प्रमाणावर कचरा–डेब्रीज टाकण्याचे काम सुरू केले आहे. कचरा–डेब्रीज थेट कांदळवन, खारफुटींवर टाकून जीवजैविकता नष्ट केली जात आहे.

.../२

## पनवेलमध्ये मनसेकडून मराठी भाषा दिनानिमित्त मराठी स्वाक्षरी मोहीम



**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रसिद्ध कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस (२७ फेब्रुवारी) 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. जगभरात २७ फेब्रुवारीला साजरा केला जाणाऱ्या मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून पनवेल शहरातील छ. शिवाजी महाराज चौकात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने 'मी मराठी माझी स्वाक्षरी मराठी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच पनवेल रेल्वे स्थानकात मराठी भाषा दिनानिमित्त आकर्षक भव्य रांगोळी रेखाटण्यात आली होती.

मराठी भाषा दिनानिमित्त मनसे दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करत असते. यंदाही मनसेने एक आगळावेगळा उपक्रम हाती घेतला. मी मराठी माझी स्वाक्षरी मराठी या मोहिमेला पनवेल, कळंबोली, कामोठे, नवीन पनवेलसह परिसरात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी फलकावर मराठीत स्वाक्षरी करून पनवेलकरांनी मराठी भाषा दिन साजरा केला. याप्रसंगी मनसेच्या रायगड जिल्हा महिला अध्यक्षा अदिती सोनार, पनवेल शहर अध्यक्ष संजय मुरकुटे, उपशहर अध्यक्ष अमय गागण, प्रकाश लाड, पनवेल तालुका

.../२

## संक्षिप्त...

### मुंबईच्या अनेक भागातील वीजपुरवठा खंडित

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एमएसईबीच्या मुलुंड–ट्रॉम्बे वाहिनीमध्ये बिघाड झाल्याने मुंबईतील अनेक भागातील विजपुरवठा आज सकाळी खंडित झाला. याचा परिणाम लोकलसेवेवरही झाला. तसेच चर्चगेट–अंधेरी भागातील लोकलसेवा काही काळ बाधित झाली होती. दरम्यान काही काळाने शहरातील काही भागातील वीजपुरवठा सुरळीत झाला असून, मुंबई सेंट्रल ते विलेपार्ले भागातील रेल्वेसेवाही पूर्वपदावर आली आहे. बेस्टच्या इलेक्ट्रिक सप्लाय विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार एमएसईबीच्या मुलुंड ते ट्रॉम्बे २२० केबी ट्रान्समिशन लाईनमध्ये तांत्रिक बिघाड होऊन ट्रिपिंग झाल्याने मुंबईतील बऱ्याच भागातील वीजपुरवठा सकाळच्या वेळी खंडित झाला होता. दरम्यान काही वेळानंतर शहरातील काही भागांमधील वीजपुरवठा सुरळीत झाला. या बिघाडाचा फटका रेल्वेसेवेलाही बसला. मुंबईतील अनेक भागातील वीजपुरवठा खंडित झाल्याने चर्चगेट ते अंधेरी विभागातील रेल्वेसेवा विस्कळीत झाली होती. मात्र नंतर काही वेळात मुंबई सेंट्रल ते विलेपार्ले दरम्यानची रेल्वेसेवा सुरळीत करण्यात रेल्वेला यश आले.

### शिवसेना पनवेल महानगर तर्फे अनोखा कार्यक्रम...

## मराठी पाट्या लावणाऱ्या दुकानदार, व्यापाऱ्यांचा सत्कार करून साजरा केला मराठी राजभाषा दिन




**दै.रायगड नगरी । माथेरान**

थोर साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जन्मदिन मराठी राजभाषा दिन म्हणून २७ फेब्रुवारी रोजी संपूर्ण महाराष्ट्रात साजरा करण्यात येतो. शिवसेना पनवेल महानगर तर्फे हा दिवस अत्यंत आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. राज्यभरातील सर्व दुकानांच्या पाट्या या सरसकट मराठी अक्षरात असतील असा निर्णय राज्य शासनाने जाहीर केला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शिवसेना पक्ष पुढे सरसावला व त्यांनी अनेक दुकानदारांना पत्र देऊन आपल्या पाट्या मराठीत लावण्याची विनंती केली तर अनेकदा आक्रमक होत या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी भाग पाडले. परंतु शिवसेना पनवेल महानगर संघटक माजी नगरसेवक ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या संकल्पनेनुसार शिवसेना पनवेल महानगर तर्फे महानगर प्रमुख रामदास शेवाळे व महानगर संघटक प्रथमेश सोमण यांनी पनवेलमधील मराठी पाट्या लावणाऱ्या दुकानदारांचा आज सत्कार केला.

अनेकांनी पूर्वीपासूनच मराठी पाट्या लावल्या होत्या तर काहींनी शासनाच्या या निर्णयानंतर आपल्या दुकानांवरील पाट्या ठळक स्पष्ट मराठी भाषेत लिहिल्या. अशा पाट्या लावणाऱ्या अनेक दुकानांपैकी काही प्रातिनिधिक दुकानात जाऊन मानपत्र व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला व दुकानांच्या बाहेर अभिनंदन करणारे स्टिकर्स लावण्यात आले. ज्याप्रमाणे मराठी पाट्यांच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आक्रमक होणारा शिवसैनिक असतो तसाच माय मराठीचा मान राखल्यावर कौतुक करणाराही ही शिवसैनिकच असतो असे मत प्रथमेश सोमण यांनी व्यक्त केले तर संपूर्ण महानगर क्षेत्रात शिवसेनेतर्फे मराठी पाट्या लावणाऱ्यांचे कौतुक करण्यात येईल असे रामदास शेवाळे यांनी जाहीर केले. शिवसेनेच्या या

.../२

## खोरा बंदरात जेट्टी वाढविण्याची आवश्यकता: ओहोटीच्या वेळी पर्यटन व्यवसाय ठप्प

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी खोरा बंदरात येणाऱ्या पर्यटकांची हिरमोड होत आहे. कारण समुद्रातील ओहोटीच्या वेळी किल्ला पाहण्यासाठी जाणाऱ्या फेरिबोट ठप्प होत आहेत. या ठिकाणी असलेली जेट्टी कमी पडत असल्याने खोरा बंदरातील पर्यटन व्यवसाय सुद्धा ठप्प होत आहे. म्हणून खोरा बंदरातील जेट्टी वाढविण्याची गरज आहे.



जगप्रसिद्ध जंजिरा किल्ला पाहण्यासाठी देश विदेशातील अनेक पर्यटक मोठ्या प्रमाणात येत आहेत. काही वर्षांपूर्वी मुरुडला येणाऱ्या पर्यटकांसाठी किल्ल्यामध्ये प्रवेशासाठी

.../२

## मनसे स्टाईलने कर्जतच्या व्यापाऱ्यांना दणका



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कर्जत मध्ये दुकानांच्या नावांचे फलक मराठीत असावेत. त्यासाठी दोन दिवसांचा कालावधी दिला होता.

९८ टक्के व्यापारी वर्गाने या साठी सहकार्य केले ज्यांनी याची दखल घेतली नाही. त्यांच्या इंग्रजी फलकांना तालुकाध्यक्ष महेंद्र निगुडकर यांच्या नतृत्वाखाली बाजारपेठेत प्रभात फेरी काढून मनसे स्टाईल उत्तर दिले.

# मराठी भाषेचा आदर करा घरी शक्यतो मराठीतच बोला : सचिन मयेकर

**दै.रायगड नगरी । कर्जत**

पूर्वी सर्वांनाच इंग्रजी शिकणे शक्य नव्हते. बहुतेक जण मराठीतच शिकून नंतर इंग्रजी शिकले. तरीही अनेक जण उच्चपदस्थ अधिकारी आहेत. इंग्रजीची या काळात गरज आहेच मात्र आपल्या मायबोलीला दुर्लक्षित करून चालणार नाही. आपल्या मराठी भाषेचा आपण कायम आदर ठेवला पाहिजे. आपली मुले इंग्रजी शाळेत शिकत असली तरी शक्यतो घरी मराठी भाषेचा वापर करा.' असे विचार विभागीय भांडार अधिकारी सचिन मयेकर यांनी येथे व्यक्त केले.



कर्जत एस. टी. आगारच्या वतीने मराठी राजभाषा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. जेष्ठ पत्रकार विजय मांडे यांच्या हस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून समारंभाचे उदघाटन करण्यात आले. यांप्रसंगी वाहतूक निरीक्षक हरेश पालकर, सहाय्यक वाहतूक निरीक्षक देवानंद मोरे, महादेव पालवे आदी उपस्थित होते. वाहतूक नियंत्रक वसंत बागुल यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

दीपक देशमुख यांनी प्रास्ताविकात, कार्यक्रमाचा उद्देश सांगितला. विजय मांडे यांनी, 'हा समारंभ करताना थोडीशी नाराजी वाटते कारण आ-पले काही बांधव अजूनही संपावर आहेत. हा संप लवकर मिटून सर्व सामान्यांचे हाल थांबवत असे मला वाटते.' असे सांगून 'मराठी ही दोन नंबरची श्रीमंत भाषा असून संस्कृत ही एक नंबरची श्रीमंत भाषा आहे तर इंग्रजी या २६ अक्षरांच्या भाषेचा क्रमांक त्यानंतर लागतो. इंग्रजी भाषा या स्पर्धेच्या युगात शिकणे आवश्यक आहे तरीही आपल्या मराठी भाषेला विसरता कामा नये. सर्व ठिकाणी आवण मराठी भाषेतच बोलले पाहिजे.' असे स्पष्ट केले. यांप्रसंगी प्रवासी व कर्मचारी उपस्थित होते.

# खारआंबोलीतील गटाराच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील खार आंबोली ग्रामपंचायत हद्दीत दलितवस्ती सुधारणा योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या गटाराची दुरावस्था झाली असून साचणा-या सांडपाण्यामुळे दुर्गंधी पसरुन तसेच डासांच्या प्रादुर्भावामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांच्यावतीने धर्मेश मोरे यांनी सरपंच व ग्रामसेवकांना एका निवेदनाद्वारे केली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, आपल्या ग्रामपंचायतीमार्फत सन.२०२१ मध्ये दलितवस्ती सुधारणा योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या गटाराचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असून गटारात मोठमोठे खड्डे पडले असून सांडपाणी साचून डासांचा प्रादुर्भाव होतो आहे. शिवाय सांडपाण्यामुळे दुर्गंधी पसरुन गावामध्ये मलेरिया, डेंग्यू सारखे आजार होण्याची भिती व्यक्त होत असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामपंचायतीमार्फत बांधण्यात आलेल्या गटाराची दुरावस्था साचणारे दुर्गंधी युक्त सांडपाणी व यामुळे आरोग्याचा धोका लक्षात घेऊन आपणाकडून प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने योग्यती उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांच्यावतीने धर्मेश मोरे यांनी ग्रामपंचायतीकडे निवेदनाद्वारे केली आहे. सदर निवेदनाच्या प्रती अलिबाग मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्रशेठ दळवी, मानसी दळवी व तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.



# राज्यस्तरीय ऑनलाईन निबंध स्पर्धेस उत्तम प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । उरण**

मराठी राजभाषा दिन व कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व्हावा, मराठी भाषेविषयी प्रेम, आपुलकी निर्माण व्हावी, मराठी भाषा दैनंदिन व्यवहारात, आचरणात आणली जावी, या दृष्टीकोनातून श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था व रायगड जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय ऑनलाईन निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील स्पर्धकांनी सहभाग घेतला. या निबंध स्पर्धेला जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला असल्याची माहिती सुधीर मुंबईकर यांनी दिली.

श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून प्रत्येक महिन्यात विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. संस्थेच्या प्रत्येक उपक्रमाला जनतेचा नेहमीच उत्तम प्रतिसाद लाभत असतो.

रायगड जिल्हा माहिती कार्यालय व श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था उरण यांच्या संयुक्त माध्यमातून आयोजित केलेल्या ऑनलाईन राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे कार्यालय, कोप्रोली चौक, कोप्रोली, तालुका उरण, जिल्हा रायगड येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी सुधीर मुंबईकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात या निबंध स्पर्धेच्या कार्यक्रमाचे कौतुक करीत मराठी भाषेच्या अस्तित्वासाठी, मराठी भाषा वृद्धिंगत करण्यासाठी अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे कार्यालय,कोप्रोली चौक, कोप्रोली, तालुका उरण, जिल्हा रायगड येथे आयोजित केलेल्या बक्षीस वितरण कार्यक्रमाची प्रस्तावना संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील यांनी केली. यावेळी निबंध स्पर्धा आयोजित करण्याची भूमिका, हेतू सुदेश पाटील यांनी स्पष्ट करून सांगितली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षक सुधीर मुंबईकर तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते नंदन म्हात्रे, माधव म्हात्रे उपस्थित होते. यावेळी उपस्थित निबंध स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या व या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले.

# कर्जतमध्ये आठव्या राज्यस्तरीय रेनबो कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेचा शुभारंभ



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मध्ये आठव्या राज्यस्तरीय रेनबो कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. आज रात्री पर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत राज्यभरातील साडे पाचशे कराटे पटू सहभागी झाले आहेत.

कर्जत मधील रॉयल गार्डन सभागृहात आंतरराष्ट्रीय कराटे बुडोकान ऑस्ट्रेलिया संलग्न रेनबो बुडोकॉन कराटे अकादमी आयोजित आठव्या रेनबो कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उदघाटन ब्लॅकबेल्ट वसंत शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. यांप्रसंगी शरद नथु बडेकर, हनुमंत गायकर, नरेश बडेकर, ॲड. गोपाळ शेळके, संजय आठवले, अनंत खुळे, राजेंद्र भोसले आदी उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये कराटे पटू आले असून तीन गटात ही स्पर्धा होत आहे. स्पर्धेचे परीक्षक म्हणून वसंत शेट्टी, नरेश बडेकर, विशाल गायकवाड हे काम पहात आहेत. संपूर्ण स्पर्धेचे सुत्रसंचालन पांडुरंग आहिर करीत आहेत. तीन गटात ही स्पर्धा होत असून या स्पर्धेत मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, सांगली, सातारा आदी ठिकाणाहून कराटे पटू सहभागी झाले आहेत. आज रात्री पर्यंत या स्पर्धा चालणार आहेत.

# श्रीवर्धन मध्ये आदिवासी बांधवांसाठी क्षेत्र भेट

## वडवली येथील उपक्रमशील शेतकरी गणेश कांबळे यांनी दिले धडे

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी - श्रीवर्धन तालुक्यातील वडवली येथे आदिवासी बांधवांना शेती क्षेत्र भेट चे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'कातकरी उत्थान अभियान सप्तसूत्री कार्यक्रम' अंतर्गत कार्यक्रमात आदिवासींना भाजीपाला उत्पादन बाबत माहिती देण्यात आली.

या भेटीत कुडगाव येथील आदिवासी बांधवांना वडवली येथील उपक्रमशील शेतकरी गणेश कांबळे यांच्या शेतातील विविध भाजी वर्गीय पिकांच्या उत्पादना बाबत माहिती देण्यात आली. यावेळी कोंकण कृषी विद्यापीठाचे डॉ. सिद्धेश सावंत, कृषी विभागाचे अधिकारी यांनी आदिवासी बांधवांना मार्गदर्शन केले. कृषी विभागाच्या विविध योजनांची यावेळी माहिती देण्यात आली. आदिवासी बांधवांसाठी स्थानिक रोजगार निर्मिती हा या क्षेत्र भेटीचा मुख्य उद्देश होता.

सदर क्षेत्र भेटीचे आयोजन श्रीवर्धन महसूल व कृषी विभाग यांचे मार्फत करण्यात आले. सदर भेटीदरम्यान उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन अमित शेडगे, तहसीलदार सचिन गोसावी यांनीही आदिवासी बांधवांसोबत संवाद साधला. यावेळी सरपंच प्रियांका रुपेश नाक्ती, माजी उपसरपंच दीपक कांबळे, कृषी सहाय्यक पंकज पाटील आदी उपस्थित होते. आदिवासी शेतकरी स्वावलंबी बनावा, त्याची आर्थिक प्रगती व्हावी यासाठी त्यांच्या भाजीपाला द्वारे चांगले उत्पन्न मिळवून देणाऱ्या पीक पध्दती सुचवून त्यांच्या जीवनात सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी जिल्हा प्रशासनाने हा नाविण्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे.



जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनखाली तालुक्यातील आदिवासी बांधवांना विविध दाखले वाटप, रेशन कार्ड / आधार कार्ड वाटप, आरोग्य तपासणी, रोजगार निर्मिती, कृषी योजनांची माहिती, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, वनहक्क अधिनियम अंमलबजावणी या सप्तसुत्री अंतर्गत शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.


**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग, माणगांव**

**ई-निविदा सुचना क्र.०६ सन २०२१-२०२२**

जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत खालील पाणी पुरवठा योजनेच्या कामाची निविदा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग माणगांव यांचेकडून मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनेचे नांव | अंदाजित किंमत (रु.लक्ष) |
|---|---|---|
| १ | चाणजे पाणी पुरवठा योजना, ता.उरण, जि.रायगड | ८९४.७१ |

योजनेचा सविस्तर तपशिल दि.२८/०२/२०२२ पासून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

दिनांक : २१/०२/२०२२

सही/-
(व्ही.के.सुर्यवंशी)
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
विभाग माणगांव

आरओसी २०२१-२२/क्र.५/सी ४७१६


पृष्ठ क्र.१ वरुन...

## बेकायदेशीरपणे कचरा-डेब्रिज टाकण्याचे काम सुरुच

तसेच या गंभीर प्रश्नावर संबंधित शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांकडूनही जाणीवपूर्वक कानाडोळा डोळा केला जात असल्याचा गंभीर आरोप येथील रहिवासी व मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाटील यांनी केला आहे.

## पनवेलमध्ये मनसेकडून मराठी भाषा दिनानिमित्त मराठी स्वाक्षरी मोहीम

महिला अध्यक्षा वर्षा पाचभाई, विभाग अध्यक्ष शोभा गोरिवले, उपशहर अध्यक्षा योगिनी गुंजाळ यांच्यासह मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मनसे रायगड जिल्हा महिला अध्यक्षा आदिती सोनार यांनी सांगितले की, मनसेने मराठी माणूस पुन्हा एकदा जागा केला आहे. यापुढेही मनसेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातील. दुकानांना मराठी पाट्या लावणे बंधनकारक असल्याचा निर्णय केवळ मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या सांगण्यामुळेच लवकरात लवकर होऊ शकला त्यामुळे कोणत्याही राजकीय पक्षाने याचे श्रेय घेऊ नये. मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी महाराष्ट्रात दुकानांच्या पाट्या मराठीत लावण्यासंदर्भात वेळोवेळी आवाज उठवला आहे. तरीदेखील अद्यापही ज्यांनी जाणीवपूर्वक पाट्या मराठीत केल्या नाहीत, त्यांना एवढेच सांगणे आहे की आपण महाराष्ट्रात राहतो, मराठी माणसाशी पंगा घेऊ नका, लवकरात लवकर पाट्या मराठीत करा अन्यथा मनसैनिक तुम्हाला योग्य उत्तर देतील.

## दुकानदार, व्यापाऱ्यांचा सत्कार करून साजरा केला मराठी राजभाषा दिन

उपक्रमामुळे पनवेलमधील दुकानदार व व्यापाऱ्यांमध्ये एक चांगला सकारात्मक संदेश गेल्याचे मत व्यापाऱ्यांनी व्यक्त केले.

यावेळी पनवेलचे उप महानगर संघटक अच्युत मनोरे, शहर प्रमुख प्रवीण जाधव, युवासेनेचे विधानसभा अधिकारी पराग मोहिते, महिला आघाडीच्या शहर संघटिका अर्चना कुलकर्णी, उपशहर प्रमुख राहुल गोगटे, अब्रार मास्टर, सनी टेमघरे उपविभाग प्रमुख बाळा शेटे, शाखाप्रमुख अभिजीत साखरे, प्रसाद सोनवणे माजी नगरसेवक विश्वास म्हात्रे व इतर पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.

## खोरा बंदरात जेट्टी वाढविण्याची आवश्यकता

एकमेव राजपुरी जेट्टी उपलब्ध होती. पर्यटकांची वाढती लोकसंख्या पाहता राजपुरी येथे वाहतूक व्यवस्था कमी पडत असे. त्यामुळे अनेक पर्यटक किल्ला न पाहताच परत जात होते. त्याला पर्याय म्हणून मुरुड खोरा बंदर पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यात आले. परंतु या ठिकाणी भरती ओहोटीचा विचार करता येथिल जेट्टी वाढविण्याची आवश्यकता आहे.

समुद्रातील ओहोटीच्या वेळी पाणी खुपच कमी झाल्याने सदर जेट्टीला फेरी बोट लावून पर्यटकांना उतरविण्यासाठी कसरत करावी लागत आहे. अशा वेळी एखाद्या पर्यटकाचा पाय घसरून अपघात होण्याची शक्यता आहे. भविष्यात असे न घडण्यासाठी बंदर विकास खात्याने लवकरात लवकर जेट्टीची व्यवस्था करावी व येथिल पर्यटन व्यवसाय वाढीसाठी हातबोट लावावा अशी स्थानिक व पर्यटकांची मागणी आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**
**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूसंपादन विभागातर्फे साडेबावीस टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना वाटपाबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नोड- पुष्पक नोड (उलवे) | | | | | | | | |
| १ | ०९/ NUR | मौजे-गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड प्रकरण क्र.३९/२०२१ | २७६/१ | ०-७६-३० | १२१० चौ.मी. | पुष्पक नोड उलवे येथील भूखंड क्र. १३७, सेक्टर-२६, क्षेत्र १२१० चौ.मी. | श्री. प्रभाकर तुकाराम देशमुख<br>श्री. जगदिश तुकाराम देशमुख<br>श्री. सूर्यकांत काळुराम देशमुख<br>निर्मला नारायण देशमुख<br>सुनिता बाळाराम देशमुख<br>श्री. प्रदिप नारायण देशमुख<br>श्री. संतोष नारायण देशमुख | निरंक |
| | | | एकूण क्षेत्र | ०-७६-३० | | | | |
| २ | २९/ NUR | मौजे-गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड प्रकरण क्र.३८/२०२१ | २८७/२ब | ०-३७-४० | ५९० चौ.मी. | पुष्पक नोड उलवे येथील भूखंड क्र. ३८८, सेक्टर-२६, क्षेत्र ५९० चौ.मी. | श्री. शशिकांत मोरेश्वर देशमुख | |
| | | | एकूण क्षेत्र | ०-३७-४० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितानी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज व पूरक कागदपत्रांसह बाब निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
भूसंपादन विभाग, १ ला मजला, सिडको भवन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अपर जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४४२/२०२१-२२


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मराठी राजभाषा दिनाचे औचित्यसाधून वनवासी विद्यार्थ्यांना पुस्तक संचाचे वाटप

**दै.रायगड नगरी । कर्जत**

श्री लक्ष्मीकांत वाचनालय व ग्रंथसंग्रहालय कर्जत व विश्व हिंदू परिषद कर्जत प्रखंड यांच्या संयुक्त प्रयत्नातून आज मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून कर्जत मधील पळसदरी, भिसेगाव, बामणोली, नांगुर्ले या चार वनवासी वाड्यांवर शालेय विदयार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी म्हणून हुतात्मा नाग्या दादा कातकरी साखळी पुस्तक योजना सुरू करण्यात आली.

यावेळी प्रत्येकी २५ छोट्या पुस्तकांचा संच प्रत्येक वाडी वर एका स्वयंसेवकाकडे ठेवण्यात आला व ती पुस्तके वाचून पूर्ण झाल्यावर हा संच बदलून दुसरा संच परत दिला जाईल अशी योजना आहे, ही साखळी योजना सुरवातीला कर्जत मधील एकूण १६ वाड्यांवर सुरू करण्यात येत आहे, मुलांमध्ये या विषय अत्यंत उत्साह दिसून आला.

या प्रसंगी लक्ष्मीकांत वाचनालयाचे कार्याध्यक्ष पद्माकर गांगल, सचिव सूचिता जोगळेकर, ग्रंथपाल रामदास गायकवाड, गावचे पोलीस पाटील विनया खोपकर, जिल्हा बजरंग दल संयोजक साईनाथ श्रीखंडे, प्रखंड मंत्री विशाल जोशी, सचिन ठाकूर, समाजसेवक महेंद्र निगुडकर, वसंत महाडिक, गाजनन पवार, अंकुश दरेकर उपस्थित होते.

## म्हसळा कार्याध्यक्ष पदी महेंद्र गायकवाड

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ,शिवाजीराव पाटील गट शाखा म्हसळा संघटनेची सहविचार सभा बहुसंख्य सभासदांच्या उपस्थितीत रा.जि.प.शाळा खारगाव बुद्रुक येथे नरेश सावंत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.सभेमध्ये संघटनेचे रिक्त असलेल्या कार्याध्यक्ष पदावर महेंद्र गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली त्यांचे नियुक्तीचे पत्र जिल्हा उपाध्यक्ष अरविंद मोरे यांच्या मार्फत देण्यात आले. सभेला उपस्थित शिक्षक वर्गाने नवनियुक्त कार्याध्यक्ष गायकवाड यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. सभेत संघटना स्तरावर करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची व कार्यांची माहिती सचिव बिचुकले यांनी दिली.सभासदांच्या समस्या व प्रश्नांवर अध्यक्ष नरेश सावंत यांनी माहिती दिली.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# नवाब मलिकांवरील कारवाईचा सुधागड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे जाहीर निषेध

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

अल्पसंख्यांक मंत्री नवाब मलिक यांच्या अटकेच्या कारवाईचा राज्यभर निषेध होतोय. सुधागड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जाहीर निषेध केला आहे. या संदर्भातील निवेदन सुधागड पाली तहसीलदार दिलीप रायण्णावार यांना देण्यात आले.

बीजेपी हम से डरती है ईडी को आगे करती है अशा जोरदार घोषणा देत केंद्र सरकारचा निषेध देखील यावेळी करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादीचे सुधागड तालुका अध्यक्ष रमेश साळुंखे, ग. रा. म्हात्रे, नगरपंचायत उपनगराध्यक्ष अरिफ मणियार, शहराध्यक्ष अभिजीत चांदोरकर, नगरसेवक सुलतान बेनसेकर, सुधीर भालेराव, सुधाकर मोरे, सुमेध खैरे, सुनील राऊत, ललित ठोंबरे, राजेश कानाडे, सरपंच सादुराम सजेकर, सुशील शिंदे, किरण खंडागळे, संजोग शेठ, मह्म्मदभाई धनसे आदीसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

केंद्र सरकार सीबीआय, ईडी तसेच एनएआय अशा संस्थांवर अंकुश ठेवून केंद्र सरकारच्या विरुद्ध आवाज उठवणार्या पक्षाविरुद्ध व नेत्यांविरुद्ध अशा संस्थांच्या मार्फत चौकशी लावून राज्यातील सरकार तसेच मंत्री यांचे विरोधात कारवाई करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. केंद्र सरकारच्या या दडपशाहीच्या विरोधात सुधागड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आले असल्याचे सुधागड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष रमेश साळुंखे यांनी सांगितले.



# पुनम आगरकर हिचे वकिली परीक्षेत यश गायन क्षेत्रासह वकिली क्षेत्राचा सराव करणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**



प्रसिद्ध गायिका पूनम आगरकर यांनी नुकतीच बार कौन्सिल ऑफ इंडियाची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण केली. विशेष म्हणजे गायन ऍंड पूनम यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्थानिक राज्य बार कौन्सिल ची सनद घेतल्यानंतर वकिली व्यवसायाचे सर्व प्रमाणपत्र मिळवण्यासाठी तसेच वकिली क्षेत्रात कार्यरत राहण्यासाठी बार कौन्सिल ऑफ इंडिया कडून संपूर्ण देशात एकाचवेळी परीक्षा घेण्यात येते. ॲड.पुनम यांनी महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिल ची सनद घेतल्यानंतर बार कौन्सिल ऑफ इंडिया कडून गेल्या वर्षी ऑक्टोबर मध्ये परीक्षा घेण्यात आली होती. त्याचा निकाल नुकताच ऑनलाइन जाहीर झाला व त्यात त्या उत्तीर्ण झाल्या आहेत.

पूनम आगरकर या गायिका असून राज्यात अनेक ठिकाणी त्यांचे कोकणातील प्रसिद्ध असा शक्ती- तुरा व भजनाचे कार्यक्रम झाले आहेत. मूळच्या म्हसळा तालुक्यातील खारगाव येथील असून त्यांनी नेरुळ येथील एमजीएम लॉ कॉलेज मधून वकिली शिक्षण घेतले. घरीच वडीलांपासून संगीतमय वातावरण असल्याने गायनाची आवड निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. वडिलांसोबत विविध ठिकाणी कार्यक्रमात गायनाला सुरुवात केली. वडील रघुनाथ आगरकर यांच्या कडूनच संगीताचे धडे घेतल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

मात्र शिक्षणासोबतच त्यांनी गायन क्षेत्राची आपली आवड जपत त्या आता क्लासिकल भजन आणि शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम करतात. सामाजिक दृष्ट्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देखील त्यांनी आपली जिद्द कायम ठेवत शिक्षणासह शास्त्रीय संगीताची कला कायम ठेवली आहे. घरातील पोषक वातावरण व पाठिंबा यांच्यामुळे मी हे यश प्राप्त करत आहे तसेच यापुढे देखील गायन क्षेत्रासह वकिली क्षेत्रात सराव सुरू ठेवणार असल्याचे ॲड व गायिका पूनम आगरकर यांनी सांगितले.

# प्रत्येक आस्थापनामध्ये मराठी पाट्या लावण्याची मनसेची प्रशासनाकडे मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

पनवेल उरण मधील अनेक आस्थापनामध्ये, दुकानावर मराठी पाट्या, फलके नाहीत. शिवाय उरण पनवेल मधील अनेक कंपन्या, प्रकल्पामध्ये, आस्थापनामध्ये काम करीत असलेले परप्रांतीय कामगार मराठी बोलत नसल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे २७ फेब्रुवारी मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून मनसेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या विविध विभागाशी संपर्क साधून पनवेल उरण तालुक्यातील प्रत्येक आस्थापना मध्ये, दुकाने यावर मराठी पाट्या /फलके लावण्यात यावेत. तसेच परप्रांतीय कामगारांनी मराठी शिकावे, मराठी बोलावे अशी मागणी पत्रव्यवहाराद्वारे प्रशासनाकडे केली आहे.



यावेळी कामगार उपायुक्त रायगड जिल्हा प्रदीप पवार, औद्योगिक विकास महामंडळ तळोजा एमआयडिसी श्रीकांत राऊत (उप अभियंता)यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी रामदास पाटील संघटक रायगड जिल्हा रोजगार अध्यक्ष नावडे विभाग तलोजा एम आय डि सी, संजय मुरकुटे अध्यक्ष पनवेल उपशहर, अध्यक्ष प्रकाश लाड, गिरीश तिवारी सहकार सेना अध्यक्ष, स पि मिश्रा, नितेश पाटील, प्रवीण म्हात्रे, अक्षय जयस्वाल, तुळशीराम पाटील आदी मनसेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कालव्यात वाहत आलेल्या त्या मयत व्यक्तीचा खून; पोलीसांनी २४ तासात लावला छडा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

शुक्रवार दि.२५ फेब्रुवारी रोजी माणगांव पो-लीस ठाण्यापासुन जवळच असलेल्या वर्दळीच्या उतेखोल भादाव कालवा रस्त्या लगत भरदुपारी जेमतेम १ मिटर उंचीच्या कालव्याच्या पाण्यात प्रेत वाहत आले असल्याची पोलीसांना खबर मिळताच पोलीस कॉन्स्टेबल श्याम शिंदे घटना स्थळी आले व स्थानिकांच्या मदतीने हे प्रेत बाहेर काढले दरम्यान माणगांवचे डिवायएसपी प्रविण पाटील व पोलीस निरिक्षक राजेंद्र पाटील हे घटनास्थळी तातडीने हजर झाले आणि एका मिसींग केसच्या माहीतीद्वारे या प्रेताची ओळख पटविण्यात आली.

मिसींग केस मध्ये ज्या महिलेने तिचा पती घरी आला नसल्याचे वर्णन केले होते. परंतु प्रत्यक्ष ठिकाणी येताच पाहता क्षणी हा आपला नवरा नसल्याचे महिलेने पोलीसांना सांगितले होते परंतु निट निरखुन पहा मृतदेहाचे अंगावरील कपडे व इतर वस्तु खाणा खुणा बाबत पोलीसांनी विचारताच तिने आपल्या नवऱ्याचे हातावर नाव गोंदवले असल्याचे सांगितले पोलीसांनी हातावरील गोंदवल्याची खुण दाखविताच व मृतदेहाचे डोक्यावर राख-लेली शेंडी व मनगटातील दोरा पाहताच तिने हा आपला नवरा असल्याचे म्हटले तिचे सोबत तिची दोन मुल होती त्यांनीही मयताचे अंगावर नेसलेली पॅण्ट ओळखत आपल्या वडिलांचीच आहे असे पटकन म्हटले नंतर त्या महिलेने हा मृतदेह आपल्या नवऱ्याचाच असल्याचे सांगितले.

पोलीसांनी मृतदेह पोस्टमॉर्टेम साठी पाठवला. या घटनेनंतर पोलीस तपासाची चक्र वेगाने फिरताच समोर आलेल्या माहितीवरुन वाहत आलेल्या त्या व्यक्तिचा मृत्यु हा खुन करुन झाल्याचे निष्पन्न होत आहे. पोलीस सुत्रांकडुन मिळालेल्या माहिती नुसार सदरची घटना ही माणगांव पोलीस ठाणे हद्दीत मौजे वाकडाईनगर येथील कालवा रोड येथील पुलाजवळ २४/०२/२२ रोजी सकाळी ५ वाजताच्या सुमारास घडली असून दिनांक २६/०२/२२ रोजी १२.४४ वाजता गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्याची हकिगत अशी की, मयत महेंद्र भरत जाधव हा समता नगर येथील साई मंदीरात पुजा करण्यासाठी जात असताना वाकडाई नगर येथील कालवा रोड वरील पुलाजवळ आले वेळी यातील संशयित आरोपी संदीप नामदेव गायकवाड याने मयत यास एकटा गाठून मयत याचे पत्नी सोबत असलेल्या अनैतिक संबंधाबाबत मयत हे वेळोवेळी संशयित आरोपी यास समजविण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचाच राग मनात धरून आरोपी याने मयत यास रोडवर ढकलून त्यानंतर त्यास कालव्या च्या पाण्यात ढकलून जिवे ठार मारले आहे. असा संशय म्हणून सदरचा गुन्हा माणगांव पोलिस ठाण्यात ४३/२०२२ भा.दं.वि.सं कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा दाखल केल्यानंतर पोलिस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी पोलिस अधीक्षक अशोक दुधे, अप्पर पोलिस अधीक्षक अतुल झेंडे, उप विभागीय पोलिस अधिकारी प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शनाखाली ताबडतोब गुन्ह्या-तील संशयित आरोपी संदीप नामदेव गायकवाड याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. सदर गुन्ह्यातील आरोपी चा शोध घेणे कामी निजामपूर रवाळजे आणि इंदापूर पोलीस दूर-क्षेत्रा मध्ये तात्काळ नाकाबंदी लावली व पोलीस टीम रवाना करुन सदर संशयित आरोपी यास ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.


## ग्रामपंचायत विचुंबे
### ता.पनवेल, जि.रायगड
### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, खालील वर्णनित मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | इमारतीचे नाव | फ्लॅट क्र. | सद्यस्थितीतील मालकाचे नाव | खरेदी करणाऱ्याचे नाव | पवल क्रमांक | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रीन व्हॅल्ली | B1-304 | शिवराम सहदेव डवले, शालिनी शिवराम डवले | विजय रंगनाथ दाते, पुष्पा रंगनाथ दाते | ५८०४/२०१८ | ४१४ चौ.फु. |
| २ | दिगंबर अपार्टमेंट | 203 | श्री समर्थ एंटरप्रायझेस तर्फे प्रो.प्रा.श्री.किरण अनंत भोईर | सतीश बाबाजी गोसावी, सुचिता सतीश गोसावी | ७८२४/२०१८ | ३१२ चौ.फु. |
| ३ | ओमकार पार्क-२ | A-03 | महालक्ष्मी रवी बरनाम | मोहद चाँद हसामी, अजमती चाँद दफाली | २६२/२०२० | ३५० चौ.फु. |
| ४ | ओमकार पार्क-२ | A-205 | परवेज अहमद इद्रीस अहमद शेख | सनील चंद्रकांत पाटील, सुप्रिया सनील पाटील | १५०७५/२०२१ | २५० चौ.फु. |
| ५ | शिव रेसिडेन्सी | E-302 | मे.शिव एन्टरप्रायझेस तर्फे भागीदार नरसी गोविंद रावरिया | धर्मेंद्र प्रसाद | ११८४/२०१९ | ३७.७४ चौ.मी. |
| ६ | राज रेसिडेन्सी | B-105 | मयत रेखा प्रभाकर वाकेकर यांचे वारस पती/प्रभाकर सखाराम वाकेकर, मुलगा/अमोल प्रभाकर वाकेकर, मुलगी/चारुशिला निलेश साखरे यांच्या तर्फे अखत्यारी प्रभाकर सखाराम वाकेकर | अनिल कुमार झा, पुनम झा | ८७८५/२०२१ | ७५.४५ चौ.मी. |
| ७ | कृष्णा रेसिडेन्सी | 407 | मे.कृष्णा एंटरप्रायझेस बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार अच्छेलाल यादव, भागीदार जैबुन नेशा अन्सारी यांचे कु.मु. म्हणून अच्छेलाल यादव | निखिल बाबुराव कांबळे, सीमा युवराज कांबळे | १४६८१/२०२१ | ३६४ चौ.फु. |
| ८ | कृष्णा रेसिडेन्सी | 408 | मे.कृष्णा एंटरप्रायझेस बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार अच्छेलाल यादव, भागीदार जैबुन नेशा अन्सारी यांचे कु.मु. म्हणून अच्छेलाल यादव | संदीप राजू चंदालिया, सुनिता संदीप चंदालिया | १५१५९/२०२१ | २१९ चौ.फु. |
| ९ | श्री ज्ञानेश्वर माऊली को.ऑ.हौ.सो. | I-32 | नंदा अमृत गांगर्डे | संतोष लक्ष्मण तावडे, सुनिता लक्ष्मण तावडे | १२४०६/२०२१ | ४७.४ चौ.मी. |
| १० | द पर्ल | G-302 | रवींद्र रामचंद्र लिंगायत, मनिषा रवींद्र लिंगायत | अमोल नवनाथ चव्हाण, नवनाथ बाबू चव्हाण, बेबीताई नवनाथ चव्हाण | १०५९६/२०२१ | ३२.८० चौ.मी. |
| ११ | राधा रेसिडेन्सी | 309 | मे.सुरज बहाडकर एंटरप्राझेसतर्फे प्रो.प्रा.सुरज सुरेश बहाडकर | हरेश महादेव कदम | ४१७४/२०२१ | १८.७८ चौ.मी. |
| १२ | पुष्प व्हॅल्ली | A-102 | प्रकाश भानुदास सोनावणे, विलास भानुदास सोनावणे, सरस्वती भानुदास सोनावणे | सुहास तुळशीदास महाजन, मनिषा सुहास महाजन | १५९७२/२०२१ | ६४५ चौ.फु. |
| १३ | शिव रेसिडेन्सी | H-103 | मे.शिव एन्टरप्रायझेस तर्फे भागीदार लखमन गोवाभाई भाटेसारा | ललित मोहन मांजरेकर, माधवी मोहन मांजरेकर | ६९२/२०२० | ३७.७४ चौ.मी. |
| १४ | गोपाळ कृष्ण | 403 | मे.एस.एस.इंटरप्रायझेस तर्फे भागीदार सतीश राम म्हात्रे | प्रसाद रामचंद्र गावडे, पुजा प्रसाद गावडे | ५१४/२०२० | १९३ चौ.फु. |
| १५ | लक्ष्मी पार्क | D-204 | लक्ष्मण बिरु लांबोर, बिरु बाबू लांबोर | शमिता सतीश फडणीस | ३४१/२०२२ | ३०.७२ चौ.मी. |
| १६ | मंगलमुर्ती कॉम्प्लेक्स | J-103 | सदानंद पांडुरंग धुळाणावर | संकेत अनिल धाणेकर, अश्विनी अनिल धाणेकर | १३८/२०२२ | ४६७ चौ.फु. |
| १७ | श्री लक्ष्मी पार्क | E-302 | भक्ती भरत जमनु, भरत भिकाजी जमनु | ज्ञानेबा विठ्ठल कदम | ५७४८/२०२१ | ४२.१८ चौ.मी. |
| १८ | शिवशंभो अपार्टमेंट | 402 | मे.शिवशंभो इंटरप्राझेस तर्फे प्रो.प्रा.सुशिल वासुदेव भिंगारकर | पल्लवी सुभाष चव्हाण उर्फ पल्लवी मनोहर धोटनकर, सुभाष सदाशिव चव्हाण | ९२४/२०२० | ३७५ चौ.फु. |
| १९ | शिवशंभो अपार्टमेंट | 302 | मे.शिवशंभो इंटरप्राझेस तर्फे प्रो.प्रा.सुशिल वासुदेव भिंगारकर | प्रकाश बाबुराव काजारी, रुपाली प्रकाश काजारी | १०६८१/२०१८ | ३७५ चौ.फु. |
| २० | प्रयाग आकृती | B-206 | रामदास पांडुरंग नरे | संदीप ज्ञानदेव खोसे, सुनंदा संदीप खोसे | ९२४६/२०२० | १८७ चौ.फु. |
| २१ | वेद अपार्टमेंट | 403 | वेद इंटरप्रायझेस तर्फे मालक श्री.किरण प्रभाकर भोईर | अल्पेश अनिल कदम | ७१९/२०२१ | ३२१ चौ.फु. |
| २२ | ओमकार पार्क | B-02 | कै.जयश्री भालचंद्र कोटेकर मयत तर्फे कायदेशीर वारस म्हणून सौ. ज्योती शरद पाटील व सौ.शिल्पा मदन कटेकर | स्वाती नंदेश पाटील-कै. जयश्री भालचंद्र कोटेकर मयत तर्फे कायदेशीर वारस | १०६०६/२०२१ | २३.२३ चौ.मी. |
| २३ | ग्रीन व्हॅल्ली/लुनिया रियल्टी | 12-01 | मे.लुनिया रियालिटी तर्फे भागीदार श्री.विनोद गंगाराम जैन हे दस्त निष्पादक व त्यांचे वतीने कबुली जबाब देण्याकरिता अखत्यारी म्हणून सागर किसन पवार | योगेश भिकाजी तांबे, निलम पांडुरंग शिर्के, वाईफ ऑफ योगेश भिकाजी तांबे | १२३३३/२०१९ | ४६७ चौ.फु. |
| २४ | मंगलमुर्ती कॉम्प्लेक्स | B-302 | नुतन विक्रम धरत, धनस्मृती | सदाशिव दशरथ फडतरे, अश्विनी सदाशिव फडतरे | १२७१८/२०२१ | ५८७ चौ.फु. |
| २५ | शिवशंभो अपार्टमेंट | 303 | मे.शिवशंभो इंटरप्रायझेस तर्फे प्रो.प्रा.सुशिल वासुदेव भिंगारकर | विदुला संदेश जाधव | ४८५०/२०१७ | ३७५ चौ.फु. |
| २६ | शिवशंभो अपार्टमेंट | 203 | मे.शिवशंभो इंटरप्रायझेस तर्फे प्रो.प्रा.सुशिल वासुदेव भिंगारकर | शुभम अनंत कदम, अनंत रामचंद्र कदम | ३८०/२०१७ | ३७५ चौ.फु. |
| २७ | शिवशंभो अपार्टमेंट | 203 | मे.शिवशंभो इंटरप्रायझेस तर्फे प्रो.प्रा.सुशिल वासुदेव भिंगारकर | निलम लक्ष्मण कांबळे, लक्ष्मण बापू कांबळे | १०३५७/२०१८ | ३७५ चौ.फु. |
| २८ | त्रिमुर्ती वंदन | F-202 | नामदेव बाळु फडके | विनोद रामचंद्र पवार, असावरी विनोद पवार | १०११७/२०१५ | ४०० चौ.फु. |
| २९ | शिव रेसिडेन्सी | F-202 | मे.शिव एन्टरप्रायझेस तर्फे भागीदार लखमन गोवाभाई भाटेसारा | पवार भुषण रमण, कविता भुषण पवार | १८२२५/२०१९ | ३३.२१ चौ.मी. |
| ३० | मंगलमुर्ती कॉम्पलेक्स | J-302 | सदाशिव दशरथ फडतरे, अश्विनी सदाशिव फडतरे | अक्षय नरोत्तम वरिया, मीना नरोत्तम वरिया | १३२६८/२०२१ | ४२९ चौ.फु. |
| ३१ | इंद्रव्हॅल्ली | B2 /404 | अवधूत बाबुराव सावंत | शुभम बाळाराम पाटील | १६९६९/२०२१ | ३८३ चौ.फु. |
| ३२ | सुर्या एनक्लेव | 3 | श्री.पुरुषोत्तम बबन भोईर | केशव जया बुटीकर, जनाबाई केशव बुटीकर | १७८५/२०२१ | ३५.८ चौ.मी. |
| ३३ | शिवम को.ऑ.हौ.सो. | A-104 | ग्लेडीस डेसमंड डिमेलो | सिद्धांत राजन टोपरे, साधना राजन टोपरे | १५६२९/२०२१ | ३५९ चौ.फु. |
| ३४ | निळकंठ विहार | 05-301 | सीमा सुरेश पहाडे | रुपाली आशिष जैन वाईफ ऑफ आशिष सुरेश जैन | १२३६४/२०२१ | ३३.३५ चौ.मी. |
| ३५ | ग्रीन व्हॅल्ली | 02-107 | शारदा आर धारेश्वर | श्री.ओमप्रकाश गुलाबप्रसाद शर्मा | १५८२/२०१८ | ४५६ चौ.फु. |
| ३६ | दिगंबर अपार्टमेंट | 201 | श्री समर्थ एंटरप्रायझेस तर्फे प्रो.प्रा.श्री.किरण अनंत भोईर | भास्कर सावजी गोसावी, भावना भास्कर गोसावी | ७८२५/२०१८ | २०१ चौ.फु. |
| ३७ | दिगंबर अपार्टमेंट | 202 | श्री समर्थ एंटरप्रायझेस तर्फे प्रो.प्रा.श्री.किरण अनंत भोईर | भास्कर सावजी गोसावी, भावना भास्कर गोसावी | ७८२६/२०१८ | १९४ चौ.फु. |
| ३८ | साई कृपा रेसिडेन्सी | 203 | मे.साईकृपा इंटरप्रायझेस तर्फे भागीदार श्री.प्रकाश गंगाराम जैन | महादेव प्रकाश सावंत, वसुधा प्रकाश सावंत | ७४०३/२०२१ | ३९.९ चौ.मी. |
| ३९ | शिव रेसिडेन्सी | G-202 | मे.शिव एन्टरप्रायझेस तर्फे भागीदार लखमन गोवाभाई भाटेसारा | रोशन दत्ताराम घोसाळकर | ११२७१/२०१९ | ३७.७४ चौ.मी. |

तरी वरील वर्णनित प्राप्त परिस्थिती वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या सदर फ्लॅट मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींना व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह ग्रामपंचायत कार्यालय विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड येथे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील ७ रोजातील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**श्री.सुहास विष्णू वारे**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत विचुंबे**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सौ.नम्रता आकाश पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत विचुंबे**
**ता.पनवेल, जि.रायगड**

## संक्षिप्त...

### कळंबोली येथे एकदिवसीय लाक्षणिक उपोषण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर खासदार संभाजीराजे भोसले आक्रमक झाले असून त्यांनी बमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे. मुंबईच्या आझाद मैदानात संभाजीराजे भोसलेंनी उपोषणाला सुरुवात केले आहे. महाराजांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाज कळंबोली यांच्या वतीने कळंबोली येथील पोलिस निवारा चौक या ठिकाणी एक दिवशी लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या वेळी उपोषण कर्त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या व आरक्षणाच्या संदर्भात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच शिवछत्रपतींच्या नावाचा जयघोष करण्यात आला. या वेळी सकल मराठा समाज कळंबोली चे नेते रामदास शेवाळे, किरण नागरगोजे, अवधूत साळुंखे,जोतिराम साळुंखे, महादेव क्षीरसागर, श्रीकांत फाळके, शुभम गोडसे, संभाजी चव्हाण, शरद पवार, निलेश दिसले,सागर मोरे,नाना पवार, निलेश टाकळकर यांच्या सह अनेक नागरिक उपोषणाला बसले होते. जे समाज बांधव उपोषणाला आझाद मैदानावर हजर राहू शकत नाहीत अशा नागरिकांसाठी हे लाक्षणिक उपोषण केले असल्याची माहिती सकाल मराठा समाज कळंबोली चे नेते रामदास शेवाळे यांनी या वेळी दिली.

### पनवेल तहसिलच्या पथकाने केली बेकायदा वाळू उत्खननाविरोधात कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील बेकायदा वाळू उत्खननाविरोधात पनवेलचे तहसिलदार विजय तळेकर यांच्या नेतृत्वाखाली कारवाई करण्यात आली आहे.

पनवेल परिसरात अनेक ठिकाणी बेकायदा वाळू उत्खनन केले जाते व रात्रीच्या वेळेस मोठ्या प्रमाणात वाळू चोरी होत असते. याबाबतच्या अनेक तक्रारी पन–वेल तहसिल कार्यालय व संबंधित पोलिस ठाण्याकडे ग्रामस्थांनी केल्या आहेत. त्यानुसार वेळोवेळी अशांविरूद्ध कारवाई करण्यात येते. अशाच प्रमाणे कामोठे हद्दीत ओहोटीच्या वेळी बोटीच्या सहाय्याने वाळू उपसा होत असल्याची माहिती पनवेल तहसिलला मिळताच तेथे विशेष पथकाने कारवाई करून वाळू उपसा करणाऱ्या अंदाजे ५ लाख रूपयांच्या ५ बोटी हस्तगत केल्या आहेत. परंतु या कारवाईच्या वेळी बोटीतील कामगार पसार झाले आहेत.

# कर्जत रेल्वे स्थानकावर डब्यांची स्थिती दर्शविणारे फलक बसविण्याला सुरुवात

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत रेल्वे स्थानकात डब्यांची स्थिती दर्शविणारे फलक बसविणात यावेत यासाठी रेल्वे प्रशासनाशी गेल्या दोन वर्षा पासून पाठपुरावा करणारे सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांना अखेर यश मिळाले आहे. कर्जत रेल्वे स्थानकात डब्यांची स्थिती दर्शविणारे फलक बसविण्याची सुरुवात केली आहे.

कर्जत स्थानकात आरक्षण केल्यानंतर गाडी पकडण्यासाठी येणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. कधी आपला आरक्षित डबा शोधण्याच्या नादात गाडी चुकायची तर कधी समान फलाटवरच रहायचे तर काही वेळा डबा पकडण्याच्या नादात अपघातही झाले आहेत. त्यामुळे कर्जत रेल्वे स्थानकात एक्सप्रेस गाड्याच्या बाबतीत डब्यांची स्थिती दर्शविणारे छोटे डिजिटल इंडिकेटर्स बसविण्यात यावेत. यासाठी सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल गेल्या दोन वर्षा पासून रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करीत होते.



सुरुवातीला कर्जत रेल्वे स्थानकावर एक्सप्रेस गाड्याच्या बाबतीत डब्यांची स्थिती दर्शविणारे छोटे डिजिटल इंडिकेटर्स बसविण्याची मागणी केली असता रेल्वे प्रशासना कडून, कर्जत रेल्वे स्थानकावर एक्सप्रेस गाड्याच्या डब्यांची स्थिती दर्शविणारे छोटे डिजिटल इंडिकेटर्स ची गरजच नाही. असे कळविले होते.

यावर ओसवाल यांनी कर्जत रेल्वे स्थनाकात एक्सप्रेस च्या डब्यांची स्थिती दर्शविणारे डिजिटल इंडिकेटर्स ची का आवश्यकता आहे. हे पटवून दिले व पुन्हा विनंती केली असता रेल्वे प्रशासनाने याकरिता कोणी जाहिरातदार उपलब्ध होतो काय? किंवा कुणी व्यावसायिक प्रसिद्धीसाठी उपलब्ध होतो काय? हे पाहिल्यावर कर्जत रेल्वे स्थानकावर तसे इंडिकेटर्स बसविण्यात येईल. असे ओसवाल यांना कळविले होते. या बाबतीत रेल्वे प्रशासना कडून काहीच कार्यवाही होत नसल्याने ओस–वाल यांनी काही दिवसांनी पुन्हा पाठपुरावा केला असता रेल्वे प्रशासनाने ओसवाल याना फलाट क्रमांक एक ची लांबी वाढविल्या नंतर इंडिकेटर्स बसविण्यात येईल असे कळविले. फलाट क्रमांक एक चे लांबीचे काम पूर्ण झाल्यानंतर त्यांनी रेल्वे प्रशासनाला पुन्हा विचारणा केली असता रेल्वे प्रशासनाने कर्जत रेल्वे स्थानकात ज्या – ज्या सुविधा दिल्या पाहिजे होत्या त्या दिल्या आहेत असे सांगत कर्जत रेल्वे स्थानकावर इंडिकेटर्सची आवश्यकता नाही असे रेल्वे प्रशासनाने म्हणायचे होते हे लक्षात आल्यावर ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाला 'कर्जत रेल्वे स्थानकावर इंडिकेटर्स बसविले नाहीत आंदोलन करण्यात येईल. असा इशारा दिल्यानंतर रेल्वे प्रशासना कडून आर्थिक वर्ष २०२१ – २२ मध्ये या कामाची मंजुरी विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनीय दिली होती. त्यानुसार कर्जत रेल्वे स्थानकावर सुरू करण्यात आले आहे व ते लवकरच पूर्ण होईल.

> कर्जत रेल्वे स्थानकात एक्सप्रेस गाड्याच्या बाबतीत डब्यांची स्थिती दर्शविणारे छोटे डिजिटल इंडिकेटर्स बसविण्याची सुरुवात करण्यात आली आहे व येत्या काही दिवसात पूर्ण होईल व कर्जतकरांची होणारी गैरसोय लवकरच दूर होणार आहे.
>
> **पंकज मांगीलाल ओसवाल, सामाजिक कार्यकर्ते, कर्जत**

## पाली अंबा नदीत कफन व अंत्यविधीचे साहित्य, आरोग्य धोक्यात



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पालीतील अंबा नदी जॅकवेल जवळ नदीपात्रात शनिवारी (ता.२६) चक्क कफन व अंत्यविधीचे साहित्य टाकल्याचे निदर्शनास आले. यामुळे नदीचे पाणी तर दूषित झालेच, मात्र नागरिकांमध्ये घबराट देखील पसरली आहे.

मागील महिन्यात अंबा नदीत मेलेल्या कोंबड्या टाकण्यात आल्या होत्या. तर आता कफन आणि अंत्यविधीचे साहित्य आल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. समग्र पालीकरांना येथील अंबा नदीतून पाणीपुरवठा केला जातो.

जॅकवेल मधून पाणी काढून हे पाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट जलवाहिन्यांद्वारे पालीकरांना पुरविले जाते. परिणामी रोगराई पसरण्याचा धोका देखील आहे. मंजूर झालेली तब्बल २५ कोटींची शुद्ध पाणी योजना मागील अनेक वर्षांपासून लालफितीत अडकली आहे. वारंवार अंबा नदीचे पाणी दूषित होत असल्याने शुद्ध पाणी योजना कार्यान्वित करावी अशी मागणी देखील नागरिक करत आहेत.

### पेण अर्बन बँक महा घोटाळा प्रकरण...

## अर्बन बँकेची मालमत्ता धारकरांची वडिलोपार्जित प्रॉपर्टी नाही : नरेन जाधव

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण को–ऑपरेटिव्ह अर्बन बँकेची मालमत्ता विकून ठेवीदारांना येत्या २ वर्षात पैसे परत देण्याची वल्गना करणाऱ्या बँक बुडव्या शिशिर धारकर याची बँकेची मालमत्ता ही त्यांच्या वडिलोपार्जित प्रॉपर्टी नाही. संघर्ष समितीने सलग ११ वर्ष उपोषणे, आंदोलने, निदर्शने व न्यायालयात दाद मागून लढा दिला आहे. न्यायालयात संघर्ष समितीने वेळोवेळी सत्य समोर आणून ठेवीदारांच्या कष्टाच्या पैशावर डल्ला मारणाऱ्यांना विरोध करून बँकेमध्ये असलेल्या ठेवीदारांच्या पैशाने विकत घेतलेल्या मालमत्तेवर बँकेचे नाव चढवून घेतल्यानेच आज सदरची मालमत्ता बँकेच्या नावे आहे. ती मालमत्ता विकण्याचा अधिकार बँक बुडव्या शिशिर धारकर यांना नाही. त्यामुळे होऊ घातलेल्या पेण नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना व ठेवीदारांना भूलथापा देऊन आपला राजकीय स्वार्थ साधण्याचा शिशिर धारकर यांचा डाव जनता हाणून पाडेल असा विश्वास संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष नरेन जाधव यांनी पेण येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

या पत्रकार परिषदेला संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष नरेन जाधव, ठेवीदार जगदीश पेरवी, सुनील देशमुख, गजानन गायकवाड, हरिभाऊ कदम, विभावरी भावे, सुरेंद्र जाधव, नामदेव कासार, दिलीप दुबे व सुरेश वैद्य आदी उपस्थित होते. पेण अर्बन बँक घोटाळा २०१० रोजी उघडकीस आला. त्यावेळी तत्कालीन सहकार मंत्र्यांना शिशिर धारकर यांनी आपण दर महिन्यात ४० कोटी बँकेत भरणा करू असे लेखी पत्र दिले होते. तसेच त्यावेळी विविध वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन दर महिना ५० कोटींची कर्ज वसुली करून देण्याचे जाहीर कबूल केले होते. त्यावेळीही शिशिर धारकर खोटे बोलले होते आणि आजही ते खोटे बोलत आहेत. त्यांनी आजपर्यंत बँकेत किती पैसे वसूल करून भरले असा सवालही नरेन जाधव यांनी यावेळी केला.



नरेन जाधव पुढे म्हणाले की, पेण को–ऑपरेटिव्ह अर्बन बँकेमध्ये २००१ पासून घोटाळे सुरू होते. २०१० पर्यंत १८९ विनातारण, विना कागदपत्रे कर्ज देण्यात आली होती. सदर प्रकरणांमधून २६३५ कोटीहून अधिक रक्कम कर्ज म्हणून वाटप करण्यात आल्याचे दाखविण्यात आले होते. या काळात शिशिर धारकर यांनी बँकेचे अध्यक्ष, तज्ञ संचालक, संचालक पद भुषविली आहेत. आज ते बँकेतील घोटाळ्या संदर्भात आपल्याला काहीच माहिती नव्हती असा बनाव करीत आहेत.

शिशिर धारकर यांनी सहा कंपन्या बनवून मेटल स्क्रॅप ट्रेडिंग कॉर्पोरेशन कडून ४८० कोटी रुपये कर्ज घेतले होते. सदरचे कर्ज १७० दिवसात फेडायचे असते. परंतु ते कर्ज न फेडल्याने सीबीआय चौकशी झाली व बँकेचा घोटाळा समोर आला. या घोटाळ्यात मेटल स्क्रॅप ट्रेडिंग कॉर्पोरेशनचे अधिकारी व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे अधिकारी देखील सामील होते. त्यांना कोर्टात आरोपी करण्यात आले आहे असेही जाधव म्हणाले.

शिशिर धारकर यांच्या कारकिर्दीत बँकेने धारकर यांच्याकडे कामाला असलेल्या समीरा शेख व त्यांच्या नातेवाईकांना सुमारे ५० कोटींचे विनातारण कर्ज दिले. त्याचप्रमाणे अशोक शहा व कुटुंबीय तसेच शैलेश देशपांडे यांच्या नावे कर्ज व जामीनाची अशी अनेक प्रकरणे बनवून ३४२ कोटींची विनातारण कर्ज दिले. या रकमेपैकी केवळ ४० कोटींची मालमत्ता खरेदी करण्यात आली व उर्वरित ३०० कोटींचे काय झाले ? ठेवीदारांच्या कष्टाची रक्कम कुठे गेली ? असा सवाल यावेळी जाधव यांनी उपस्थित केला.

संघर्ष समितीच्या न्यायालयीन लढाईला मुंबई उच्च न्यायालयात २०१६ साली यश आले. मुंबई उच्च न्यायालयाने २०१६ साली बँकेची मालमत्ता विकून ठेवीदारांचे पैसे परत करण्याचा निर्णय दिला होता. या निर्णयाविरोधात एन्फॉर्समेंत डायरेक्टरेट (ईडी) ने सुप्रीम कोर्टात स्टे घेतला आहे. संघर्ष समिती ठेवीदारांच्या वतीने सुप्रीम कोर्टातही बाजू मांडणार आहे. ईडीचा व बँक बुडव्यांचा बँकेच्या मालमत्तेचेवर डोळा आहे. परंतु संघर्ष समिती ठेवीदारांचे कष्टाचे पैसे ठेवीदारांना परत मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवणार असल्याचा दावा नरेन जाधव यांनी पत्रकार परिषदेत केला.

**प्राणघातक हल्ला झाला तरी घाबरलो नाही**

पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष समित स्थापना करून लढा सुरू केल्यानंतर आपल्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. असा गौप्यस्फोट नरेन जाधव यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत केला. प्राणघातक हल्ला झाला असतानाही आपण घाबरलो नाही व घाबरणारी नाही. बँक बुडवे संघर्ष समितीच्या लढ्याला दाबण्याकरिता साम–दाम–दंड भेद चा वापर करीत आहेत. सोबत गुंड घेऊन फिरत आ–हेत. परंतु ठेवीदारांना न्याय मिळवून दिल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही असा इशारा नरेन जाधव यांनी यावेळी दिला.

## मातृभाषा असलेल्या मराठी भाषेचा वारसा जपा : इंदुमती घरत

### सीकेटी विद्यालय व कोमसापतर्फे मराठी भाषा दिन साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मराठी भाषा गोड आहे, तिची भुरळ अनेक अमराठी माणसांनाही पडली आहे त्यामुळे आपल्या मातृभाषेचा वारसा आपण जपला पाहिजे असे मत चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या इंदुमती घरत यांनी आज नवीन पनवेल येथे सोहळ्यात व्यक्त केले.

चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल व कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला.

मराठी भाषा दिनानिमित्ताने आयोजित केलेल्या या सोहळ्याचे उद्घाटन कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून झाले. सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांची प्रतिमा आणि त्यांच्या पुस्तकांचे पालखीत पूजन केल्यानंतर शाळेच्या मुख्य द्वारापासून पालखी काढण्यात आली. या पालखी बरोबर शाळेच्या विद्यार्थी – विद्यार्थिनी पारंपारिक वेष परिधान केले होते.कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे पदाधिकारी व विद्यालयाचे शिक्षक यांनी पेटे घातल्याने कार्यक्रमाला उत्सवाचे स्वरूप आले होते.

कोमसाप नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी आपल्या भाषणात, प्रत्येकाला मातृभाषेचा अभिमान आहे. ही मातृभाषा लोप पाऊ नये म्हणून तिचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे,याची सुरुवात प्रत्येकाने आपल्या घरापासून केली तर तिचा विस्तार होईल. देशातील अनेक राज्यांमध्ये त्यांच्या असणाऱ्या मातृभाषेला मोठ्या प्रमाणात महत्त्व आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्रातही मराठी भाषेला महत्त्व दिले गेले पाहिजे असे त्यांनी सांगितले. या मराठी भाषा दिनाला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर,आमदार प्रशांत ठाकूर ,संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत ,उपाध्यक्ष वाय.टी. देशमुख आणि संस्थेचे सचिव डॉ. एस.टी गडदे यांनी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्या ज्येष्ठ गझलकारा ज्योत्स्ना राजपूत,सुनिता रामचंद्र, स्मिता गांधी, रामदास गायधने,गणेश म्हात्रे,योगिनी वैदू,रमेश भोळे,सुमंत नलावडे चित्रलेखा जाधव,विलास पुंडले, अनिल दाभाडे तसेच चांगू काना ठाकूर विद्यालयाच्या इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण,सिकेटी विद्यालय इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे,पूर्व प्राथमिक इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका संध्या अय्यर, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे,अजित सोनवणे प्रशांत मोरे,अनुराधा कोल्हे उपस्थित होते. यावेळी विज्ञान रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन तसेच ज्युनियर कॉलेजच्या भित्तीपत्रिकचे उद्घाटन आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनावरील हस्तलिखित पुस्तिकेचे प्रकाशन कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष गणेश कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती पाटील,सारीका दिवेकर,सुवर्णा शिर्के यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मराठी भाषा दिनानिमित्त श्रावणी हजारे हिने गीत गायले तसेच वेदांत शिंदे याने भाषण केले.

# माथेरानमध्ये नगरपरिषदेच्या निवडणुकीपूर्वीच घुमतायत स्वबळाचे नारे ; काही पक्षांचा आघाडीसाठीच हट्ट

**दै.रायगड नगरी । माथेरान**

राज्यात सध्या ओबीसी आरक्षणाचा मुद्दा प्रलंबित असल्याने आरक्षण सोडतीची प्रक्रिया मागे ठेवत प्रभाग रचना पूर्ण करण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे.प्रभाग रचनेच्या कार्यक्रमास उशीर लागल्याने नगरपरिषदेच्या निवडणुका मे किंवा जून महिन्यात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांस अद्यापही दोन ते तीन महिन्यांचा कालावधी सुध्दा लागू शकतो.

परंतु माथेरान मधील एकंदरीत राजकीय परिस्थिती पाहता माथेरान मध्ये नगरपरिषदेच्या निवडणुकीपूर्वीच कुठून तरी स्वबळाचे नारे सुध्दा घुमत आहेत तर काही पक्षांचा आघाडी करण्यासाठीच हट्ट धरलेला दिसून येत आहे. त्यातच नुकताच आपल्या पदांचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या सत्ताधारी शिवसेनेच्या सत्त–ेत एमएमआरडीए च्या माध्यमातून मोठया प्रमाणावर गावातील पॉईंट्स सह अन्य भागातील विकास कामे अद्यापही पूर्णत्वास येत आहेत. त्यामुळेच आपल्या सत्तेत अनेक कामे पूर्ण होत असल्याने याच विकास कामांच्या जोरावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी युती करून पुन्हा एकदा सत्तेत विराजमान होऊ अशी खात्री शिवसेनेला आहे. २०१६ ची निवडणूक स्वबळावर स्थापन करण्यासाठी शिवसेनेने अन्य काही पक्षातील कार्यकर्त्यांना सेनेच्या चिन्हावर सतरा पैकी एकूण चौदा उमेदवारांना निवडून आणले होते.

> राज्यातील महाविकास आघाडीच्या माध्यमातून माथेरान साठी ४२ कोटींचा निधी प्राप्त झाला आहे आणि त्यातूनच एवढी मोठी कामे प्रगतिपथावर दिसतात. २०१६ ला जर शिवसेनेची एकहाती सत्ता स्थापन केली जाऊ शकते मग आताही नक्कीच सत्ता स्थापन होईल.कुणाशीही आघाडी करण्याची आम्हा शिवसैनिकांची इच्छा मुळीच नाही. तर काही माध्यमांना सांगून उगाचच यावेळी शिवसेना आघाडी करणार अशा अफवा पसरविल्या जात आहेत.
>
> **योगेश जाधव, निष्ठावंत शिवसैनिक**

> मागील निवडणूक मध्ये शिवसेना नगरपालिका मध्ये सत्ता नसतांना स्वबळावर लढून आणि सत्तेत आली आत्ता विकासकामे सुध्दा खूपच झाली असे ओरडून सांगतात मग आघाडी कशासाठी हवी आहे ज्यांना आघाडी करण्याची आहे, त्यांनी खुशाल करावी आम्हाला सत्ता असो किंवा नसो काही एक फरक पडत नाही जे निष्ठावंत सैनिक आहेत ते स्वबळावरच लढतील आणि नगरपालिका नक्कीच काबीज करतील.
>
> **प्रकाश सुतार, माजी नगरसेवक शिवसेना**

त्यामुळे नगरपरिषदेच्या सभागृहात शिव–सेनेने एकहाती वर्चस्व प्रस्थापित केले होते. परंतु राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असल्याने माथेरान मध्ये सुध्दा महा आघाडी करून आगामी निवडणुकीला सामोरे जाण्याची




तयारी शिवसेनेतील एका गोटातून केली जात आहे तर दुसऱ्या गोटातील कार्यकर्ते स्वबळावरच निवडणूक लढवायची असा पवित्रा घेताना दिसत आहेत. तर विरोधी पक्ष असणाऱ्या सध्याच्या काँग्रेस आणि भाजप पक्षाने आपली आघाडी भक्कम करण्यासाठी पुरेपूर तयारी केली असुन यावेळी सत्ता स्थापन करणार हा दृढ विश्वास सुध्दा त्यांच्या कार्यकर्त्यांनी बोलून दाखवला आहे.

## महाशिवरात्री निमित्त देवघरातील अमृतेश्वर मंदिरात यात्रोत्सवाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

तालुक्यातील देवघर शिवकालीन अमृतेश्वर मंदिरात दरवर्षी महाशिवरात्री उत्सव निमित्ताने यात्रा भरत असते. मुळगाव देवघर आणि देवघर कोंड ग्रामस्थांच्या वतीने मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात यात्रोत्सव साजरा होतो. अमृतेश्वर मंदिरात महाशिवरात्री दिनी शिवभक्त मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात.

१ मार्च २००२२ रोजी मंदिरात सालाबादप्रमाणे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत. सकाळी ६ ते १० या वेळेत अभिषेक, पूजापाठ, महाआरती आणि गावात दिंडी सोहळा संपन्न होणार आहे. दुपारच्या सत्रात सोमजाई



प्रासादिक भजन मंडळ आगरवाडा म्हसळा आणि महापुरुष प्रासादिक भजन मंडळ पोंभुरले ता.देवगड,जि.रत्नागिरी यांचे सुस्वर संगीत भजनाचा सामना आयोजित करण्यात आला आहे. आयोजित यात्रौत्सवाला शिवभक्त, भाविकांनी उपस्थीत राहून तीर्थ प्रसादाचा लाभ घ्यावा असे जाहीर निमंत्रण मंदिर विश्वस्त सुरेंद्र शिर्के, अनिल महामुनकर, शांताराम चौकेकर यांनी दिले आहे.